RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक २५(२)] बुधवार, एप्रिल २६, २०१७/वैशाख ६, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.—** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | पृष्ठे १-२ |

दिनांक २५ एप्रिल २०१७ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक २६ एप्रिल २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९६६ चा महा. ४१. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१७ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ यामध्ये कलम २२अ समाविष्ट करणे.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम २२ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९६६ चा महा. ४१.

गायरान जमिनीच्या वापरातील परिवर्तनास प्रतिबंध असणे.

"**२२अ.** (१) जिल्हाधिकाऱ्याने, गावातील गुराढोरांच्या मोफत कुरणासाठी राखून ठेवलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "गायरान जमीन" असा करण्यात आला आहे), पोट-कलम (२) किंवा, यथास्थिति, पोट-कलम (३) यामध्ये तरतूद केलेली परिस्थिती खेरीज करून, इतर कोणत्याही वापरासाठी परिवर्तित करण्यात येणार नाही, प्रदान करण्यात येणार नाही किंवा ती पट्ट्याने प्रदान करण्यात येणार नाही.

(२) केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील कोणतेही वैधानिक प्रधिकरण किंवा कोणतेही सार्वजनिक प्राधिकरण किंवा उपक्रम (यात, यापुढे, या कलमात ज्याचा निर्देश " सार्वजनिक प्राधिकरण " असा करण्यात आला आहे) यांच्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा सार्वजनिक प्रकल्पासाठी, जर इतर कोणताही योग्य शासकीय भूखंड उपलब्ध नसेल तर, ती गायरान जमीन अशा सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा सार्वजनिक प्रकल्पांसाठी परिवर्तित करता येईल, देता येईल किंवा ती पट्ट्याने देता येईल.

(३) जर सार्वजनिक प्राधिकरण वगळता इतर अन्य प्रकल्प प्रवर्तकाच्या एखाद्या प्रकल्पासाठी गायरान जमीन अपरिहार्यपणे आवश्यक असेल आणि अशा प्रकल्प प्रवर्तकाने पोट-कलमे (४) आणि (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पूरक जमीन राज्य शासनाकडे हस्तांतरित केली तर, अशी गायरान जमीन अशा प्रकल्पासाठी परिवर्तित करता येईल, देता येईल किंवा ती पट्टयाने देता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये राज्य शासनाला हस्तांतरित करावयाच्या त्याच महसुली गावातील पूरक जमिनीचे क्षेत्र हे, त्या गायरान जमिनीच्या क्षेत्राच्या दुप्पट एवढे असेल आणि तिचे मूल्य हे, पोट-कलम (३) अन्वये अशा प्रकारे नियत करण्यात येणाऱ्या गायरान जमिनीच्या मूल्यापेक्षा कमी असणार नाही :

परंतु, पूरक जमिनीचे मूल्य हे, पोट-कलम (३) अन्वये अशा प्रकारे नियत करण्यात येणाऱ्या गायरान जमिनीच्या मूल्याएवढ्या मूल्याप्रत आणण्याची आवश्यकता असेल तेव्हा, अशा पूरक जमिनीच्या क्षेत्रात वाढ करण्यात येईल.

(५) कोणत्याही कायद्यात किंवा त्याखाली केलेल्या नियमांत किंवा काढलेल्या आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (३) अन्वये राज्य शासनाकडे हस्तांतरित करावयाची पूरक जमीन, ही जिल्हाधिकाऱ्याकडून, कलम २२ खाली केवळ मोफत कुरणासाठी किंवा त्या गावातील गुराढोरांच्या किंवा गवताकरिता किंवा वैरणाकरिता राखीव म्हणून अभिहस्तांकित करण्यात येईल.

(६) या कलमान्वये जमिनीचे कोणतेही वापरातील परिवर्तन, प्रदान किंवा पट्ट्याने प्रदान हे, राज्य शासनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून केले जाणार नाही आणि कलम ३३०अ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाखालील राज्य शासनाचे अधिकार त्यास दुय्यम असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा इतर प्राधिकाऱ्याकडे सोपविण्यात येणार नाहीत.

**स्पष्टीकरण.—** (अ) या कलमाच्या प्रयोजनार्थ, "सार्वजनिक प्रयोजन" या संज्ञेचा, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ यामध्ये तिला जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल. २०१३ चा ३०.

(ब) अशा जमिनीची पोट-कलम (३) खाली एखाद्या प्रकल्पासाठी अपरिहार्यपणे आवश्यकता आहे किंवा कसे याबाबतच्या प्रश्नावर विभागीय आयुक्तांच्या सल्ल्याने राज्य शासनाकडून निर्णय घेण्यात येईल.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG/2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग आठ

वर्ष ३, अंक ३७(२)] बुधवार, एप्रिल २६, २०१७/वैशाख ६, शके १९३९ [ पृष्ठे २, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ७७

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (*3*) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Second Amendment) Act, 2017 (Mah. Act No. XXXIV of 2017), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRAKASH H. MALI,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXXIV OF 2017.

(First published, after having received the assent of the Governor in the "*Maharashtra Government Gazette*", on the 26th April 2017).

*An Act further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966.*

Mah. XLI of 1966. WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Sixty-eighth Year of the Republic of India as follows :—

**1.** This Act may be called the Maharashtra Land Revenue Code (Second Amendment) Act, 2017. Short title.

Insertion of section 22A in Mah. XLI of 1966.

**2.** After section 22 of the Maharashtra Land Revenue Code, 1966, the following section shall be inserted, namely :— Mah. XLI of 1966.

Prohibition on diversion of use of *Gairan* land.

" **22A.** (*1*) The land set apart by the Collector for free pasturage of village cattle (hereinafter referred to as "the *Gairan* land") shall not be diverted, granted or leased for any other use, except in the circumstances provided in sub-sections (*2*) or (*3*), as the case may be.

(*2*) The *Gairan* land may be diverted, granted or leased for a public purpose or public project of the Central Government or the State Government or any statutory authority or any public authority or undertaking under the Central Government or the State Government (hereinafter in this section referred to as " Public Authority "), if no other suitable piece of Government land is available for such public purpose or public project.

(*3*) The *Gairan* land may be diverted, granted or leased for a project of a project proponent, not being a Public Authority, when such *Gairan* land is unavoidably required for such project and such project proponent transfers to the State Government, compensatory land as provided in sub-sections (*4*) and (*5*).

(*4*) The compensatory land to be transferred to the State Government under sub-section (*3*) shall be in the same revenue village have area equal to twice the area of the *Gairan* land and its value shall not be less than the value of the *Gairan* land so allotted under sub-section (*3*) :

Provided that, the area of compensatory land shall have to be suitably increased, wherever necessary, so as to make its value equal to the value of the *Gairan* land so allotted under sub-section (*3*).

(*5*) The compensatory land to be transferred to the State Government under sub-section (*3*) shall, notwithstanding anything contained in any other law, rule or orders made thereunder, be assigned by the Collector under section 22 for the use only of free pasturage of village cattle or for grass or fodder reserve.

(*6*) No diversion, grant or lease of *Gairan* land under this section shall be done by any authority other than the State Government and notwithstanding anything contained in section 330A, the powers of the State Government under this section shall not be delegated to any officer or other authority subordinate to it.

*Explanation.*—(*a*) For the purposes of this section, the term "public purpose" shall have the same meaning as assigned to it in the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013. 30 of 2013.

(*b*) The question whether or not such land is unavoidably required for a project under sub-section (*3*) shall be determined by the State Government on the advice of the Divisonal Commissioner.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.